दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ११७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 19 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 117 | Pages 4 | Rate 4 Rs

### भाजपने साखरेच्या सुरीने मित्रपक्षाचा गळा कापला

**मुंबई**–रोहित पवार म्हणाले, साखरेच्या सुरीने मित्रपक्षाचा गळा कापण्यात भाजपचा हात कुणीही धरणार नाही. याच अनुषंगाने कळमनुरी मतदारसंघात शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांच्या विरोधात उभा करण्यासाठी भाजपाने आपल्या निष्ठावंतांना अंगावरील माशी झटकावी तसं बाजूला सारलं आणि आगामी उमेदवार म्हणून प्रज्ञाताईंना पक्षात प्रवेश दिला. यावरून २०२९ मध्ये मित्रपक्षांना संपवून भाजप स्वबळावर निवडणूक लढेल, हे मी अनेकदा केलेलं भाकित हळूहळू सत्यात उतरताना दिसतंय. बाकी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा प्रज्ञाताई सातव यांचा निर्णय अत्यंत दुर्दैवी आहे. त्यांच्या या निर्णयाने स्व. राजीव जी सातव यांच्या आत्म्यास नक्कीच दुःख झालं असेल, असे ते म्हणालेत.

# नराधमाचा बालपणावर घाला!

## ऊसतोड मजुरांच्या वस्तीतील नराधमाचे अमानुष कृत्य

### नराधम आरोपीची बायको त्याच्या पासून राहते विभक्त

**या अत्यंत संतापजनक घटनेतील आरोपी लक्ष्मण ऊर्फ सागर निवृत्ती वाघमारे हा दारू पिण्याच्या सवयीचा असल्याने त्याची बायको त्याच्या पासून विभक्त राहत आहे. ती ऊस तोड मजूर म्हणून काम करीत आहे. त्याची बायको ही पीडित अल्पवयीन मुलीच्या बहिणी सोबत ऊसतोडणी करण्यासाठी आली असल्याची माहिती त्याला मिळाली. म्हणून तो तिला शोधत तिला भेटण्यासाठी गेला होता. मात्र त्याची बायको ही उसाच्या फडात काम करीत होती. त्यावेळी वस्तीवरच्या कोपीवर असलेल्या अल्पवयीन मुलीवर त्याने लैंगिक अत्याचार केला.**

**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका गावात अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. ऊस तोडणीसाठी आपल्या मोठ्या बहिणी सोबत आलेल्या एका १२ वर्षीय बालिकेवर एका नराधमाने अत्याचाराचा कळस करून तिचे तोंड दाबून लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकिस आली आहे. एका अल्पवयीन मुलीची आई ही भोळसर स्वभावाची असून तिचे वडील कर्नाटक या परराज्यात ऊस तोडणीसाठी गेले आहेत. ती मुलगी ६ वीच्या वर्गात शिक्षण घेत आहेत. वडील ऊस तोडणीसाठी परराज्यात गेले असल्याने ती मुलगी तिच्या ऊसतोडणी मजूर म्हणून कामासाठी केज तालुक्यातील एका गावातील ऊस तोड मजुरांच्या शेतातील वस्तीवर विवाहित बहिणी सोबत राहात होती. तिच्या बहिणी आणि मेव्हण्याने धारूर तालुक्यातील ऊसतोड मुकादम यांची उचल घेतली असल्याने ते केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलिस ठाणे हद्दीत असलेल्या तालुक्यातील एका गावात काम करीत होते.

दि.१५ डिसेंबर रोजी सोमवारी रोजी रात्री ८:०० च्या सुमारास सर्वजण उसाच्या शेतात असताना अल्पवयी मुलगी एकटीच त्यांच्या शेतातील ऊस तोड मजुरांच्या वस्तीवर असलेल्या कोपीवर एकटीच होती. ती संधी साधून आरोपी लक्ष्मण ऊर्फ सागर निवृत्ती वाघमारे वय (३४ वर्ष) (रा. सोमनाथ बोरगाव ता. अंबाजोगाई) हा तेथे गेला आणि त्याने तिचे तोंड दाबून तिच्यावर अत्याचार लैंगिक अत्याचार केला. या प्रकारानंतर घाबरलेल्या त्या अल्पवयीन मुलीने ही घटना तिची बहीण घरी वस्तीवर आल्या नंतर तिला सांगितली. त्या नंतर तिला घेऊन तिची बहीण ही युसुफवडगाव पोलिस ठाण्यात हजर झाली. त्यावेळी कर्तव्यावर असलेले पोलिस उपनिरीक्षक भिमराव मांजरे यांनी या गंभीर गुन्ह्याची



## १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार

माहिती सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांना दिली. अल्पवयीन पीडित मुलीच्या तक्रारी वरून नराधम लक्ष्मण ऊर्फ सागर निवृत्ती वाघमारे याच्या विरुद्ध पोक्सो आणि लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्या नंतर पोलिसांनी पीडित अल्पवयीन मुलीची वैद्यकीय तपासणी करून आरोपीला जेरबंद करण्यासाठी पथक तैनात केली.

या प्रकरणी पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत.

### असा घेतला नराधमाला ताब्यात

**गुन्हा केल्या नंतर आरोपीला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती.मिळताच तो पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र पोलिस निरीक्षक भीमराव मांजरे, पोलिस उपनिरीक्षक भारत बरडे, पिंक पथकाचे पोलिस निरीक्षक प्रकाश शेळके, पोलिस कॉन्स्टेबल भागवत निरडे आणि युसुफवडगाव ठाण्याचे कर्मचारी यांनी नराधम आरोपींच्या मोबाईल लोकेशन ट्रेस करून त्याला ताब्यात घेण्यासाठी सापळा लावला. त्याचे मोबाईल लोकेशन हे धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे असल्याचे निष्पन्न होताच आरोपी एसटीने फरार होऊ शकतो असा अंदाज काढून पोलिस बस स्टँडच्या परिसरात दबा धरून बसले. आरोपी लक्ष्मण ऊर्फ सागर निवृत्ती वाघमारे हा दि. १७ डिसेंबर बुधवार रोजी दुपारी ४:३० वा. च्या सुमारास कळंब बस स्टँडवर येताच दबा धरून बसलेल्या पोलिसांनी त्याला झडप घालून ताब्यात घेत त्याच्या मुसक्या आवळल्या.**

### आरोपीला पाच दिवसांची पोलिस कोठडी

**पोलिसांनी आरोपीला केज न्यायालयात हजर केले असता घटनेचे गांभीर्य ओळखून न्यायालयाने त्याला दि. २२ डिसेंबर पर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.**



## 'मनरेगा'मधून गांधीजींचे नाव हटवण्याच्या हालचाली संसदेत गदारोळ, INDIA आघाडी आक्रमक!

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी मोलगी**

केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) विधेयक २०२५ वरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ऐतिहासिक अशा 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्या'चे नाव बदलण्याच्या आणि त्यातील तरतुदींमध्ये बदल करण्याच्या केंद्राच्या या निर्णयाला काँग्रेससह संपूर्ण 'INDIA' आघाडीने तीव्र विरोध दर्शवला आहे.विरोधी पक्षांच्या मते, या नवीन विधेयकाद्वारे केंद्र सरकार महात्मा गांधींच्या विचारांना पुसून टाकण्याचा प्रयत्न करत आहे. या विधेयकातील काही तरतुदींवर विरोधकांनी गंभीर आक्षेप नोंदवले आहेत




त्यात

कायद्यातून राष्ट्रपिता महात्मा गांधींचे नाव हटवणे हा त्यांच्या वारशाचा अपमान असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.,नवीन प्रस्तावात केंद्र आणि राज्याचा वाटा ६०,४० असा केल्यामुळे राज्यांवर मोठा आर्थिक भार पडणार आहे. यामुळे निधीअभावी योजना कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे. 'MGNREGA' हा ग्रामीण जनतेचा कायदेशीर हक्क आहे. मात्र, त्याचे रूपांतर केवळ एका सरकारी 'अभियाना'त केल्यास गरिबांच्या 'जगण्याच्या अधिकारावर' गदा येईल, असा आरोप होत आहे., शेतीचा हंगाम असताना ६० दिवस काम बंद ठेवण्याच्या तरतुदीमुळे मजुरांच्या उपजीविकेवर संक्रांत येईल, अशी टीका होत आहे. खासदार गोवाल पाडवी (नंदुरबार) आणि काँग्रेसच्या इतर नेत्यांनी संसदेतील महात्मा गांधींच्या पुतळ्यासमोर या विधेयकाच्या प्रती दाखवून निषेध नोंदवला. मजुरांच्या घामातून उभा राहिलेला हा कायदा आम्ही कमकुवत होऊ देणार नाही, अशी गर्जना यावेळी करण्यात आली.सरकारने हे विधेयक तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणी करत विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. ग्रामीण भारताच्या हक्कासाठी हा लढा शेवटपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धार काँग्रेस पक्षाने व्यक्त केला आहे.

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला 'ग्रीन को २०२५' पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

जागतिक सहकार वर्षानिमित्त पुणे येथे होणाऱ्या सहकार मंथन २०२५ कार्यक्रमात माजलगाव येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला ग्रीन को २०२५ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सहकार सभागृह, शिवाजीनगर (पुणे) येथे महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. श्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून पारदर्शक व्यवहार, वेळेवर कर्जवाटप-वसुली, ठेवीदारांचा विश्वास, स्वयंरोजगार निर्मिती तसेच महिला व युवक सक्षमीकरणातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन श्री मंगलनाथ मल्टीस्टेटची निवड करण्यात आली आहे.



## रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**


शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल दि. दि १४ डिसेंबर ते १७ तीन दिवशीय सहल भीमाशंकर- लेण्याद्री- ओझर- शिवनेरी- नाशिक त्रिंबकेश्वर- भंडारदरा - कळसुबाई- शिर्डी -शनिशिंगणापूर- मोहटा देवी आदी ठिकाणी

भेटी देऊन संपूर्ण झाली यादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध स्थळाबद्दल भौगोलिक ऐतिहासिक माहिती देऊन त्यांच्या अभ्यासक्रमा इतर उपक्रमात भर घातली.

सहलीमध्ये मुलांनी ऐतिहासिक,भौगोलिक, नौकानयन, धार्मिक- सांस्कृतिक स्थळी निसर्गाच्या सानिध्यामध्ये विद्यार्थ्यांना अनुभूती मिळाली विद्यार्थ्यांनी स्थानिक खाद्य पदार्थांचा येथेच्छ लाभ घेतला. या सहलीसाठी राज्य परिवहन मंडळाने लालपरी बसमधून प्रवास झाला एसटी चालक श्री थोरात यांनी सुरक्षित पद्धतीने गाडी चालवली.

सहलीच्या नियोजनामध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री खोसे यांनी मोलाचा मार्गदर्शन केले. सहल यशस्वी करण्यासाठी श्री गोरे श्री देशमुख,श्री देवकते, श्री टोपे , श्री कळेकर ,श्री नाईकनवरे ,श्री शिंपले यांनी परिश्रम घेतले.

## शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न




दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल दि.१४ डिसेंबर ते १७ तीन दिवसीय सहल भीमाशंकर- लेण्याद्री- ओझर- शिवनेरी- नाशिक त्रिंबकेश्वर- भंडारदरा -कळसुबाई- शिर्डी - शनि शिंगणापूर- मोहटा देवी आदी ठिकाणी भेटी देऊन संपूर्ण झाली.यादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध स्थळाबद्दल भौगोलिक ऐतिहासिक माहिती देऊन त्यांच्या अभ्यासक्रमा इतर उपक्रमात भर घातली. सहलीमध्ये मुलांनी ऐतिहासिक, भौगोलिक, नौकानयन, धार्मिक- सांस्कृतिक स्थळी निसर्गाच्या सानिध्यामध्ये विद्यार्थ्यांना अनुभूती मिळाली विद्यार्थ्यांनी स्थानिक खाद्य पदार्थांचा यथेच्छ लाभ घेतला.या सहलीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महा मंडळाच्या लालपरी बस मधून प्रवास झाला.एसटी चालक श्री.थोरात यांनी सुरक्षित पद्धतीने गाडी चालवली. सहलीच्या नियोजनामध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री.खोसे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.सहल यशस्वी करण्यासाठी गोरे सर,देशमुख सर,देवकते सर,टोपे सर,कळेकर सर, नाईकनवरे सर,शिंपले सर यांनी परिश्रम घेतले.या सहली मुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

## जीवाचीवाडी,तुकोची वाडी, राणूबाईची वाडी तील वीज पुरवठा खंडित; शेतकरी संतप्त



दैनिक वादळ वार्ता


**केज । प्रतिनिधी**

जीवाचीवाडी,तुकोची वाडी व राणूबाईची वाडी परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.आठ तासांच्या वीज पुरवठ्यात केवळ पाच मिनिटेच लाईट मिळत असल्याने शेती पिके धोक्यात आली आहेत.

संबंधित लाईनमन व उप केंद्राशी वारंवार संपर्क साधूनही समाधानकारक प्रतिसाद मिळतनसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.लाईनमन फोनवर उडवाउडवीची उत्तरे देत असून दुरुस्तीबाबत गांभीर्य दाखवले जात नसल्याचा आरोप आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी देता येत नसल्याने सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे.या गंभीर प्रकाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून तातडीने जीवाचीवाडी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करावा,अशी मागणी सर्व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे. योग्य निर्णय न घेतल्यास तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा ही ग्रामस्थांनी दिला आहे. वीज विभागाने त्वरित दखल घेऊन समस्या सोडवावी,अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

संपादकीय

# अर्धा प्याला रिकामा, की भरलेला



नाण्याच्या दोन बाजू समजून घेतल्या, तर दोन्ही तेवढ्याच महत्त्वाच्या वाटतात. तसंच काहीसं या पेल्याबद्दल बोलता येईल. मानसशास्त्रीय अभ्यास करताना अर्ध्या पेल्याचं उदाहरण दिल जातं. प्रथम दृष्टीला किंवा तुमच्या नजरेला काय दिसतं हे महत्त्वाचं असतं; परंतु दृष्टीपेक्षा दृष्टिकोन महत्त्वाचा असल्याने एखाद्या गोष्टीमागची कारणमीमांसा शास्त्रीयदृष्ट्या पटण्याजोगी असावी. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असल्याने प्रत्येकाचा दृष्टिकोन इथं वेगळा असू शकतो. त्यांच्या प्रतिक्रिया सरळ, विचित्र, बिनविचारी असू शकतात. मुळात तुमची विचारधारा इथं महत्त्वाची असल्याने धारेला धार आणत दिलं गेलेलं स्पष्टीकरण हे शंभर टक्के न्याय देणारं असावं, त्यात कुठेही उथळपणा किंवा बोथटपणा नसावा. जे जे वाटतं ते ते थेट बोलण्यापूर्वी समृद्ध विचारांची जुळणी करत उजळणी केलेली केव्हाही उत्तम म्हणावी लागेल. एक उदाहरण देताना मला नेहमी जाणवलेली एक गोष्ट इथं नमूद कराविशी वाटते. आजकाल कुठल्याही विषयावर थेट निशाणा साधणारे नेटकरी एखाद्या घटने वा अनुभवाचे तीनतेरा वाजवतात. जगात असलेली सगळी अक्कलहुशारी यांच्याकडे असल्यासारखी अक्कल पाजळतात. कुणाच्या खासगी गोष्टीत नको एवढे नाक खुपसून त्यांच जगणं सळो की पळो करतात. एखाद्या घटनेशी संबंधित ऊहापोह करून समोरच्याला जेरीस आणतात. याचा अर्थ समजायला आणि समजवायला गेलं, तर आगपाखड करून समजवणाऱ्याची बुद्धी काढतात. समाजभान नावाची गोष्ट आपण विसरत चालले आहोत. उचलली जीभ लावली टाळ्याला असं करणं म्हणजे बुद्धी गहाण टाकल्यासारखं होय. ज्याची सुरुवात आणि शेवट एका पातळीवर येऊन संपतो. वैचारिक पातळीचा अभाव, अज्ञानाचा राक्षस, संकुचित दूरदृष्टी यामुळे नेटकरी थेट निशाणा साधतात. सद्यस्थितीत माणसं एकमेकांना समजून न घेता नकारात्मक विचारांचं मोहोळ उडवताना दिसतात जे फार वाईट आणि समाजघातक आहे. आता पेल्याबद्दल विचार करू.अर्धा प्याला रिकामा की भरलेला यावर महत्त्वाचं विधान करण्यापूर्वी स्वत:च्या सदसदविवेकबुद्धीला जोर देऊन विचार करावा. अर्धा प्याला रिकामा की भरलेला यावर भाष्य करायचं झालं तर, सुखदु:खरूपी आयुष्याच्या पायवाटेत अनुभवायला आलेले प्रसंग, त्यातून तुम्हाला प्राप्त झालेले अगाध ज्ञान आणि त्या ज्ञानाचा तुमच्यावर झालेला योग्य तो परिणाम पाहता या पेल्याचं विवेचन करता येईल. पेला रिकामा की भरलेला यापेक्षा त्यातून प्रतीत होणारा समाज आणि त्यावर आधारित समाजमन प्रत्ययाला येईल. ग्लासाच्या प्रतिमेत माणसाचं प्रतिबिंब, त्याच्या सवयी, लकबी, आचार- विचार यांचं प्रतिनिधित्व करताना दिसतात.सकारात्मक विचारांच्या आवर्तनात असे दिसून येईल की, ग्लास केवळ पाण्यानेचं नाही, तर हवेनेही भरलेला आहे. थोडक्यात त्याला पूर्ण भरलेला म्हणता येईल. पण ज्यांच्यापाशी नकारात्मकता आहे त्यांना तो अर्धा पाण्याने भरलेला दिसेल. मला विचाराल तर, तो जे आहे ते म्हणजे तटस्थ न्युट्रल म्हणजे सर्वसमावेशक असेल. फार फार तर यात तहान महत्त्वाची आहे. कारण जे पाणी मला उपलब्ध झालंय. ते माझ्यासाठी त्यावेळी खूप महत्त्वाचं आहे. माझ्या तहानेची गरज अर्ध्या ग्लासाने भागत असेल, तर मला हा प्रश्न पडणार नाही. कारण मी माझी गरज समजून घेतलेली असेन. दुसरं माझा स्वभाव जो छोट्या-छोट्या गोष्टींत सुख-समाधान मिळवण्याचं कौशल्य माझ्यात राखतो आणि तिसरं म्हणजे समाजभान. समाजात वावरताना जाणीवपूर्वक नीतीमूल्यांची गाठ बांधून घेतली की, मनाला वेसण घालण्याचं काम आपसूक होतं.संत तुकाराम महाराज म्हणतात, बळ बुद्धी वेचुनिया शक्ती। उदक चालवावे युक्ती।... पाण्याचा वापर युक्तीने करा. हा मंत्र कोणत्याही काळाला लागू पडेल असा आहे. थोडक्यात जगण्याचा आनंद घेताना जगा आणि जगू द्या हा मंत्र आजमावता आला पाहिजे. सोशल मीडियाच्या काळात अनेक मतंमतांतर असू शकतात. यात आपली काय भूमिका असावी हा वस्तुपाठ आहे. ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान। या संत वचनात थोडासा बदल करून मी असे म्हणेन की, ठेविले अनंते ऊत्कर्ष साधावे, चित्ती असू द्यावे समाधान। परिस्थितीशी सामना करताना, आनंदाचं परिमाण शोधताना, घडलेले कष्ट माझ्या ठायी एवढे रुजलेत की, अर्धा पाण्याचा ग्लास समाधानानं अमृत म्हणून ओठी लावेन. यात अंतिम सत्य एकच असेल, त्यागापेक्षा तृप्तीतली विरक्ती महत्त्वाची.

# मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत शासकीय आय.टी.आय.कॉलेज परांडा येथे स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**धाराशिव । प्रतिनिधी**

शासकीय आय.टी.आय. कॉलेज परंडा येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री.के. जे.पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज, वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट,कमोडिटी व इक्विटीमध्ये असलेला फरक,डिमॅट अकाउंट, तसेच सेबीच्या सारथी पचे महत्व,मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी श्री.आर.बी.पवार सर,के.एम.भोसले सर, एन.एम.फाळके सर, आर.के.जाधवर सर,एस. के.सोमवंशी सर,बी.पी. मोरे मॅडम यांनी प्रयत्न केले व श्री.के.एम.भोसले सर यांनी सूत्रसंचालन केले.तसेच याकार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# विमानतळ नामकरणाला 'वेटिंग', पण विकासाचे 'रेटिंग' जोरात; विक्रांत पाटलांचा वर्षपूर्ती अहवाल!

## सिडकोच्या घरांच्या किंमती करून गरीब जनतेला मोठा दिलासा

दैनिक वादळ वार्ता

**पनवेल । प्रतिनीधी**

पनवेलला होत असलेल्या आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळा प्रमाणेच पनवेल शहरही सामाजिक,शैक्षणिक,भौगोलिक,सांस्कृतिक,औद्योगिक दृष्ट्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवणार असल्याचे सुतवाच विधान परिषदेतील आमदार विक्रांत पाटील यांनी पनवेल येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले आहे.तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरणाची बाब ही केंद्राच्या अधिपत्यात असून त्याचा पाठपुरावा निश्चित स्वरूपात महाराष्ट्र शासनाकडून सुरू आहे. त्यामुळे विमानतळाच्या नामकरणाला थोडा विलंब होऊ शकतो असेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले आहे. विधान परिषदेमधील आमदार विक्रांत पाटील यांनी त्यांच्या वर्षाभराच्या कालावधीत अर्थसंकल्प अधिवेशन पावसाळी अधिवेशन व हिवाळी अधिवेशन या कालावधीमध्ये केलेल्या लोकप्रमुख कामगिरीचा आढावा घेण्यासाठी पनवेल मधील पीस पार्क हॉटेलमध्ये मंगळवारी सायंकाळी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी अधिवेशन कालावधील मधील तारांकित प्रश्न, लक्षवेधी, विशेष उल्लेख, अवचित्य मुद्दे, अल्पकालीन चर्चा व अर्धा तास चर्चा यामधील एकूण २५१ प्रश्न हे पनवेल तालुका व महानगर क्षेत्रातील समाजभिमुख व लोकांशी निगडित असलेले प्रश्न उपस्थित करून विकासात्मक निर्णय घेण्यात शासनाला भाग पाडले आहे. जनतेच्या जिव्हाळ्या बाबत असणारे पाणी,रस्ते, वीज, नयना बाधित प्रकल्प, पनवेलच्या सर्वसामान्यांचा जिव्हाळ्याचा असलेला एसटी बस डेपोच्या विकासाचा प्रश्न,सिडकोशी संबंधित असणारे विविध अनेक वर्षापासून प्रलंबित प्रश्न हे त्यांनी विधान परिषदेमध्ये आपल्या झंजावाती कार्यकालात मांडून पनवेलकरांचा बुलंद आवाज हा विधान परिषदेमध्ये दाखवून दिला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना अनुसरून शासनाने ही त्वरित त्याबाबत अंमलबजावणी करून योग्य तो फायदेशीर निर्णय हा पनवेलकरांना मिळवून दिलेला आहे व त्यामध्ये १९८४ सालापासून असलेल्या सिडकोच्या परिवहन विभागात काम करत असलेल्या १६०० कर्मचाऱ्यांना थकीत वेतन मिळवून देण्याचा असो किंवा पनवेलकरांच्या पाण्याचा मूलभूत प्रश्न असो, शासनाने सुरू केलेला नैना प्रकल्प बाधित शेतकऱ्यांचा प्रश्न असो, पोलिसांच्या करता असलेल्या पनवेल मधील २२० खोल्यांचा प्रश्न असो, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विक्रीएशन सेंटर व अद्यावत ऑडिटोरियम उभारणे बाबत, मुंबई विद्यापीठाच्या मध्यवर्ती वाचनालयाच्या धर्तीवर एक अद्यावत लायब्ररी उभारण्याबाबत,सिडकोणे निर्माण केलेल्या गृह संकुलातील प्रश्न असो , महानगरपालिका क्षेत्रातील विजेच्या समस्या बाबतचा प्रश्न, सिडको वसाहती मधील रस्ते गटार रस्त्यावर नसलेल्या फुटपात समस्या बाबत, पनवेल शहर हे झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे बाबत, पनवेल परिसरातील सिडको बाधित गावठाण क्षेत्रांमध्ये गरजेपुरती बांधलेल्या वाढीव बांधकाम नियमित करणे बाबत,पनवेल मध्ये होत असलेल्या वायू प्रदूषणाबाबत व सिडको ने निर्माण केलेल्या घरांच्या किमतीमधील दर कमी करण्याचा प्रश्न असो हे जनतेशी अत्यंत जिव्हाळ्याची आणि आर्थिक बाबतीत विकास घडवणारे अनेक प्रश्न त्यांनी विधान परिषदेमध्ये मांडले. त्यामुळे शासनाला योग्य तो निर्णय घेण्यासही त्यांनी उद्युक्त केले आहे.पनवेलच्या सामाजिक, सांस्कृतिक,भौगोलिक, व्यावसायिक, औद्योगिक, शैक्षणिक बाबती मधील विविध जनतेशी मूलभूत असणाऱ्या प्रश्नांची योग्य ती माहिती घेऊन त्याचा सखोल अभ्यास करून त्याच्या संबंधित असणारे विविध प्रश्न त्यांनी आपल्या विधान परिषदेच्या एक वर्षाच्या कालावधीत मांडून शासनाचे लक्ष वेधले आहे.शासनाकडे त्याचा पाठपुरावाही केला आहे. त्यातूनच पनवेलकरांना भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न हा ही सुटलेला असल्याचे त्यांनी सांगितले आहे.सिडकोच्या परिवहन विभागामध्ये काम करत असलेल्या कामगारांना तब्बल १५७ कोटी रुपयांची देणी देण्यास सुरुवात झाली आहे.सिडको ने बांधलेल्या घरांच्या किमती ह्या दहा टक्क्याने कमी करण्यास त्यांनी सरकारला निर्णय घेणे भाग पडले आहे.त्याचाही परिणाम यांनी सिडकोची घरे घेतली आहेत त्यांच्या आर्थिक जडणघडणी वरती त्याचा मूलभूत परिणाम होणार आहे.पनवेलला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांचे जाळे उभारणे आवश्यक आहे,जिथे जिथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्यान उभारणे,वाहनांची होत असलेली कोंडी सोडवण्यासाठी उड्डाणपुलाची उभारणी करणे आवश्यक आहे, याबाबतही ते लवकरच प्रशासनाशी चर्चा करून त्याबाबतही शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या पत्रकार परिषदेमध्ये विचारण्यात आलेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये नवी मुंबई विमानतळाचे नामकरण कधी व कसे होणार २५ डिसेंबरला नामकरण होणार की नाही याबाबत विचारले असता ते म्हणाले की विमानतळाचे नामकरण चा ठराव हा महाराष्ट्र शासनाने करून केंद्राकडे पाठवलेला आहे. नवी मुंबई विमानतळा प्रमाणेच अन्य विमानतळाचे नामकरणाचे प्रस्तावही केंद्रात गेलेले आहेत. याबाबत योग्य ति पूर्तता झाल्यानंतर योग्य वेळी नामकरणाचा निर्णय हा केंद्राकडून निश्चित घेतला जाईल. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाला थोडासा विलंब होऊ शकतो असे यावेळी त्यांनी स्पष्ट सांगितले आहे.



# गेल्या वर्षीच्या तुलनेत मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे 'समीर ऍप' व संकेतस्थळावर अधिकृत आकडेवारी उपलब्ध हवा गुणवत्तेसाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची अधिकृत आकडेवारीच बघण्याचे आवाहन

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे उपलब्ध झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार गेल्यावर्षी दिनांक १ ते १६ डिसेंबर २०२४ च्या तुलनेत यंदा सदर कालावधीदरम्यान हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे. दिनांक १ ते १६ डिसेंबर २०२४ या कालावधीसाठी गेल्यावर्षी हवा गुणवत्ता निर्देशांक हा १६७ ते १५८ या दरम्यान होता. तर, यंदा दिनांक १ ते १६ डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी हा निर्देशांक १०५ ते ११३ असा सुधारित झालेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाद्वारे मुंबईतील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी अविरतपणे व सातत्याने केले जात असलेले सर्वस्तरिय प्रयत्न याचे सकारात्मक परिणाम केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे जारी करण्यात आलेल्या हवा गुणवत्ता निर्देशांकाच्या (AQI) आकडेवारीमध्ये दिसून येत असल्याची माहिती अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे यांनी दिली आहे.या अनुषंगाने अधिक माहिती देताना डॉ. अविनाश ढाकणे यांनी सांगितले की, हवा निर्देशांक पाहण्याकरिता नागरिकांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे जारी करण्यात आलेली अधिकृत आकडेवारीच बघावी. यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे https://cpcb.nic.in हे संकेतस्थळ व भ्रमणध्वनीवर उपलब्ध असणारे 'समीर' हे अधिकृत ऍप वापरावे, असेही आवाहन त्यांनी यानिमित्ताने केले आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या अत्याधुनिक यंत्र-सामुग्रीद्वारे (CAAQMS) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता नियमितपणे तपासली जाते. ही तपासणी करण्यासाठी उच्च गुणवत्तेची (Reference Grade) हवा गुणवत्ता मापन यंत्रणा वापरली जाते. या यंत्रणेद्वारे उपलब्ध होणारी आकडेवारी ही अधिक विश्वासार्ह असते. यानुसार ही आकडेवारी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या https://cpcb.nic.in या संकेतस्थळावर आणि 'समीर' (SAMEER) या अधिकृत भ्रमणध्वनी ऍपवर उपलब्ध करुन देण्यात येत असते. यानुसार दिनांक १ ते १६ डिसेंबर या दरम्यानची हवा गुणवत्ता निर्देशांकाची (AQI) वर्ष २०२५ व २०२४ या सलग दोन वर्षांची तुलनात्मक आकडेवारी (कंसातील आकडेवारी ही त्याच दिनांकाची गेल्यावर्षीची आकडेवारी आहे) पुढीलप्रमाणे :-

दिनांक १ डिसेंबर - १०५ (१६७),
दिनांक २ डिसेंबर - १२६ (१७४),
दिनांक ३ डिसेंबर - १२८ (१२९),
दिनांक ४ डिसेंबर - १३८ (१३९),
दिनांक ५ डिसेंबर - १२४ (१५४),
दिनांक ६ डिसेंबर - ११६ (१४८),
दिनांक ७ डिसेंबर - ११३ (१२६),
दिनांक ८ डिसेंबर - १२० (१२५),
दिनांक ९ डिसेंबर - ११५ (११२),
दिनांक १० डिसेंबर - १०१ (१३१),
दिनांक ११ डिसेंबर - १०५ (१३९),
दिनांक १२ डिसेंबर - ११२ (१३७),
दिनांक १३ डिसेंबर - ११५ (१२८),
दिनांक १४ डिसेंबर - १३१ (१३४),
दिनांक १५ डिसेंबर - १२२ (१५९),
दिनांक १६ डिसेंबर - ११३ (१५८).

वरील आकडेवारी लक्षात घेतल्यास गेल्या काही महिन्यांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे सातत्याने करण्यात येत असलेल्या सर्वस्तरिय प्रयत्नांचे सकारात्मक प्रतिबिंब या आकडेवारीमध्ये पडल्याचे दिसून येत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.बृहन्मुंबई महापालिकेद्वारे करण्यात येत असलेल्या सर्वस्तरिय प्रयत्नांमध्ये पाण्याच्या टँकरद्वारे डीप क्लीनिंग करण्यासह रस्ते स्वच्छ करणे, मिस्टींग मशीनद्वारे फवारणी करणे, योग्य उपाययोजना न करणा-या बांधकामांना कारणे दाखवा नोटीस बजावणे, कार्यस्थगिती आदेश (Stop Work Notice) देणे, या बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे. या अंतर्गत दिनांक १ ते १६ डिसेंबर २०२५ दरम्यान ३७६ ठिकाणी पाण्याच्या टँकरद्वारे रस्ते स्वच्छ करण्यासह डीप क्लीनिंग करण्यात आले, २५३ ठिकाणी मिस्टींग मशीनद्वारे फवारणी करण्यात आली, ३५३ प्रकरणी कारणे दाखवा नोटीस; तर १२१ ठिकाणी कार्यस्थगिती आदेश बजाविण्यात आले आहेत. या सर्व उपाययोजनांमुळे यंदाच्या हिवाळ्यातील हवा गुणवत्तेत सुधारणा दिसून येत असून, ती मध्यम श्रेणीत आहे, अशी माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण व वातावरणीय बदल खात्याचे उप आयुक्त श्री. अविनाश काटे यांनी दिली आहे.या अनुषंगाने सर्व संबंधितांना पुन्हा एकदा आवाहन करण्यात येत आहे की, कचरा जाळणे अथवा तत्सम बाबी करणे टाळावे. त्याचबरोबर प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे व प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे देण्यात येणा-या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेला सहकार्य करावे.

# निवडणूक विषयक कामकाजाचा विविध प्राधिकरणांच्या बैठकीतून आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी घेतला आढावा

## विविध राजकीय पक्ष प्रतिनिधींशी विशेष सभेव्दारे निवडणूकविषयी साधला सुसंवाद;प्रसारमाध्यम प्रतिनिधींशीही वार्तालाप

दैनिक वादळ वार्ता
**नवी मुंबई । प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगामार्फत नवी मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६, निम्मिताने१५ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निवडणुकीशी संबधित महानगरपालिकेचे अधिकारी तसेच पोलीस व इतर सर्व प्राधिकरणांचे अधिकारी आणि निवडणूक आयोगामार्फत नियुक्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील निवडणूक निर्णय अधिकारी व तहसिलदार, नायब तहसिलदार संवर्गातील सहा.निवडणूक अधिकारी यांची विशेष बैठक घेत निवडणूक कामकाज निष्पक्ष व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी परस्पर समन्वयाने सामुहिक भावनेने काम करावे असे निर्देश दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ. राहुल गेठे, सह.पोलीस आयुक्त संजय येनपुरे, नमुंमपा निवडणूक विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे तसेच इतर प्राधिकरणांचे अधिकारी उपस्थित होते.

**राजकीय पक्ष प्रतिनिधींच्या विशेष बैठकीतून निवडणूक विषयक व आचारसंहिता नियमांबाबत माहिती प्रसारण**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची विशेष बैठक घेऊन आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी निवडणूक विषयक संपूर्ण माहिती देत आचार संहितेच्या नियमांचे काटेकोर पालन करुन निवडणूक प्रक्रिया सुव्यवस्थित रितीने पार पाडण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या विविध प्रश्नांना सुयोग्य उत्तरे देऊन शंका समाधान केले. यावेळी प्रथमत:च एका प्रभागात चार सदस्य अशाप्रकारे बहुसदस्यीय पध्दतीने निवडणूक होत असल्याने एका मतदाराला आपल्या प्रभागातील अ,ब,क,ड अशा चार उमेदवारांना मतदान करावयाचे आहे याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. याकरिता आपल्यामार्फतही नागरिकांमध्ये जनजागृती करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**पत्रकार परिषदेतून माध्यम प्रतिनिधींशी निवडणूक विषयक सुसंवाद – सहकार्याचे आवाहन**

विविध प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी नमुंमपा निवडणूकीविषयी सुसंवाद साधतांना आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निवडणूक कार्यक्रमाची संपूर्ण माहिती दिली. नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं.५.३० यावेळेत होणार असून मतमोजणी शुक्रवार १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० पासून होणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली. याकरिता ०१ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली असल्याची सांगत २३ डिसेंबर २०२५ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ तसेच ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील असे त्यांनी सांगितले. २५ डिसेंबर व २८ डिसेंबर रोजी नामनिर्देशन पत्रे देण्यात व स्विकारण्यात येणार नाहीत असे त्यांनी नमूद केले.३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. पासून नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून त्यानंतर लगेचच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. ०२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ०३ या वेळेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असून ०३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ नंतर निवडणूक चिन्ह नेमून दिले जाणार आहे. ०३ जानेवारी रोजीच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे व १५ जानेवारी रोजी निवडणूक होणार आहे असे त्यांनी सांगितले. नमुंमपा निवडणूक १११ सदस्य संख्येकरिता होत असून २८ प्रभाग झालेले आहेत. त्यामध्ये २७



प्रभाग हे ४ सदस्यीय असून एक प्रभाग ३ सदस्यीय आहे. एकुण ९,४८,४६० इतकी एकूण मतदार संख्या असून त्यामध्ये ५,१६,२६७ पुरुष व ४,३२,०४० इतके स्त्री मतदार आणि १५३ इतर मतदार आहेत. यावेळी चार सदस्यीय प्रभाग असल्याने एका मतदारास चार सदस्यांना मतदान करावयाचे आहे, यादृष्टीने एका मतदान केंद्रावर जास्तीत जास्त ८०० ते ८५० मतदार असतील याकडे लक्ष देण्यात आलेले आहे. एकूण २८ प्रभागांसाठी ११४१ इतकी मतदान केंद्रे कार्यान्वित असणार आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे रितीने पार पाडण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन सज्ज असून या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या ६२७५ कर्मचा-यांचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली. निवडणूकीकरिता आठ विभाग क्षेत्रासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये स्थापित करण्यात आली असून प्र.क्र १,२,३ करिता माता बाल रुग्णालय इमारत दिघा या ठिकाणी व प्र.क्र ४,५,७ करिता सरस्वती विद्यालय से.५ ऐरोली याठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय असणार आहे. प्र.क्र.६,८,९ करिता समाजमंदिर हॉल. भूखंड क्र १०, से. ०७ घणसोली आणि प्रक्र १०,११,१२,१३ करिता आण्णासाहेब पाटील सभागृह, पहिला मजला, से. ०५ कोपरखैरणे येथे कार्यालय असणार आहे. प्र.क्र. १४,१५,१९,२० याकरिता आण्णाभाऊ साठे समाजमंदिर, प्लॅट नं १८७ से.१० सानपाडा आणि प्र.क्र. १६,१७,१८ करिता जलतरण तलाव संकुल, भूखंड क्र १९६ से.१२ वाशी या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय आहे. प्र.क्र. २१,२२,२३,२४ करिता आगरी कोळी भवन, प्लॉट नं १२, से.२४, नेरुळ याठिकाणी तसेच प्र.क्र. २५,२६,२७,२८ करिता ए विभाग कार्यालय बेलापूर भवन, से.११, सीबीडी बेलापूर येथे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय सुरु करण्यात आले आहे.उमेदवारांना अर्ज दाखल करताना आवश्यक असणारी मालमत्ता कर, पाणीपट्टी तसेच इतर ना हरकत प्रमाणपत्रे एक खिडकी योजनेनुसार संबधित विभाग कार्यालय पातळीवरुन एकाच ठिकाणाहून देण्यात येतील असेही त्यांनी सांगितले. सद्यस्थितीत आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने अनाधिकृत बॅनर्स विरोधात धडक मोहीम हाती घेण्यात आली असून महानगरपालिकेच्या मालमत्तांसह शासकीय कार्यालये व इमारती तसेच सार्वजनिक व खाजगी जागांवरील राजकीय मजकूर हटविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या मालमत्तांवरील उद्घाटन - भूमिपूजनाच्या कोनशिला तसेच राजकीय व्यक्तींची नावे असलेले फलक झाकून घेण्याची कार्यवाही तत्परतेने करण्यात आलेली आहे. निवडणूक प्रक्रिया सुनियोजित रितीने पार पाडण्यासाठी महानगरपालिकेच्या विभाग प्रमुखांना निवडणूक कामांच्या अनुषंगाने समन्वय अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली असून आवश्यक कामे करण्याकरिता कर्मचारीवर्गही उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यामध्ये आचार सहिता अंमलबजावणी कक्षाचे समन्वयक अधिकारी म्हणून अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार काम पाहणार असून कायदा व सुव्यवस्था आणि सुरक्षा आराखडयाचे काम अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे पाहणार आहेत. मिडीया सेल व एमसीएमसी कमिटीचे समन्वयक अधिकारी म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.सत्यवान उबाळे काम पाहणार असून निवडणूक खर्च विषयक कामकाजाची जबाबदारी मुख्य लेखा परीक्षक राजेंद्र गाडेकर यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सर्व विभाग प्रमुख अधिका-यांकडे निवडणूक विषयक विविध कामांच्या जबाबदा-या सोपविण्यात आलेल्या आहेत. या सर्वांच्या एकत्रित सहयोगातून नमुंमपा निवडणूक सुव्यवस्थित रितीने पार पडतील असा विश्वास व्यक्त करीत महापालिका आयुकत डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व प्रसार माध्यमांनी मतदान करण्याचा संदेश जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सक्रीय योगदान द्यावे व एका व्यक्तीस बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार २८ प्रभागांपैकी २७ प्रभागांत चार वेळा व एका प्रभागात तीन वेळा मतदान करावयाचे आहे. ही माहितीही जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन माध्यम प्रतिनिधींना केले.

# दीक्षा फाउंडेशन अध्यक्ष समाजसेविका सौभाग्यवती दीक्षा जाधव यांना उलगुलान मुकनायिका प्रज्ञायन पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई स्थित पनवेल महानगर पालिका अंतर्गत तळोजा परिसरातील विकासासाठी झापटलेलं सामाजिक व राजकीय व्यक्तिमत्व म्हणून नोंद घ्यावी अशी व्यक्ती म्हणजे माननीय दीक्षा दिलीप जाधव होय, रोजगारासाठी तळोजा परिसरात स्थलांतरित झालेल्या, महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभरातून पोटासाठी आलेल्या नागरिकांना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. त्यांच्या समस्याचं निराकरण करण्याचा यांचा प्रयत्न स्तुत्य आणि दखलपात्र आहे. प्रस्थापित व्यवस्थेला सुरुंग लावून नवसमाज निर्मितीसाठी युवानेतृत्व म्हणून यांची ओळख सर्वपरिचित आहे. तांड्यातून सुरू झालेला हा प्रवास स्थलांतरित आणि भूमिपुत्राच्या कल्याणासाठी स्थिरवलेला हे



येथील नागरिकांचं सदभाग्य आहे.
या कार्याची दखल घेऊन परिवर्तन सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा उलगुलान मुकनायिका-प्रज्ञायन पुरस्कार यावर्षी आपणास प्रदान करण्यात येत आहे.

# माँ साहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयातील विद्यार्थी माजी सैनिक राहूल पाटील यांनी एमपीएससी परिक्षेत मिळवीले यश

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

उरण नगरपरिषदेच्या माँ साहेब मिनाताई ठाकरे वाचनालयात गेल्या दोन वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासिका सुरु करण्यात आली.या अभ्यासिकेमध्ये दररोज अनेक विद्यार्थ्यां अभ्यास करण्यासाठी सकाळी ८ वाजल्यापासून रात्री पर्यंत सलग १०-१२ तास अभ्यास करण्यासाठी बसत आहेत.अनेक वेळा विद्यूतप्रवाह खंडीत होतो परंतू तरीही त्या परिस्थितीवर मोबाईलच्या टॉर्चच्या लाईटने मात करून विद्यार्थी अभ्यास करत असतात हे सर्वश्रूत आहे.विविध परिक्षांमध्ये यापूर्वी विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळविले आहे. आताच लागलेल्या



एमपीएससी परिक्षेमध्ये माजी सैनिक राहूल पाटील यांनी यश मिळविले आहे.राहूल पाटील यांचे कर निरिक्षक या पदा करिता निवड झाल्या बद्दल ग्रंथपाल संतोष पवार,सहाय्यक कर्मचारी जयेश वत्सराज, ड निरंतर सावंत आणि सर्व विद्यार्थी यांनी पुष्पगुच्छ आणि सुधाकर पाटील लिखीत झुंज क्रांतीवीरांचे हे पुस्तक देऊन सन्मानित केले.यावेळी राहूल पाटील यांनी उत्स्फूर्तपणे मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.राहुल पाटील यांनी सदर परिक्षेचा अभ्यास करण्यासाठी बेलापूर/नेरुळ या ठिकाणी असलेल्या लायब्ररी मध्ये जाण्या येण्यामध्ये खूप वेळ वाया जात होता . त्यावेळी त्यांच्या मित्रांनी उरण मधील माँ साहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयाचे नाव सुचवले. तेव्हा पासून ते अखंडीतपणे उरण मध्ये माँ साहेब मीनाताई ठाकरे वाचनालयात(ग्रंथालयात) अभ्यास करायला जात आहेत. त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांनी माँ साहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयाला दिले आहे ग्रंथालय हे माझ्यासाठी मंदिर आहे त्याच प्रमाणे ही सेवा उरण मध्ये पूर्ण दिवस अभ्यासासाठी उपलब्ध असलेली हि एकमेव सेवा आहे असे मत नम्रपणे राहुल पाटील यांनी व्यक्त केले आहे.या संधीचा फायदा उरण मधील विद्यार्थ्यांनी घ्यावा असेही त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे.त्याच प्रमाणे उरण नगरपरिषदेने हि सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल उरण नगरपरिषदेचे कर्मचारी आणि आमचे ग्रंथालयातील ग्रंथपाल संतोष पवार, सहकारी कर्मचारी जयेश वत्सराज आणि ड. निरंतर सावंत तसेच सर्व सहकारी विद्यार्थी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या संकल्पनेतून करंजाडे मधील महिलांसाठी लाठी काठी स्पर्धा

**स्पर्धेतून लहान मुली व महिलांना सक्षम, आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न;या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक**

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या संकल्पनेतून करंजाडे मधील महिलांसाठी लाठी काठी स्पर्धा ठेवण्यात आले होते. या स्पर्धा मोठ्या आनंदमय वातावरणात संपन्न झाल्या.ह्या कार्यक्रलाला मोठ्या प्रमाणात महिला आणि मुलींनी सहभाग घेतला होता. ह्या वेळी शिव प्रतिष्ठान व शिव मावळे प्रतिष्ठान स्थापन करण्यामागील एकच हेतू आहे की समाजातील महिलांनी स्वतःच रक्षण स्वतः कसे करावे हे ह्यातून साध्य करण्यात आले. ह्या कार्यक्रमाला शिव प्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील,सुनील अंबावडे, संदीप पाटील, अविनाश ठोसर, राकेश कुसळे, सुरेश बार्वे, अमर कुसळे, पवार सर , रोहन शिर्के, शंतनू कदम, दिपक चौधरी,



आनंद पुजारी, अथर्व घाडगे, ओंकार आदी मान्यवर उपस्थित होते.ह्या वेळेस सत्यजित पाटील यांनी सांगितले कि करंजाडे मधील महिलांना लाठी काठी प्रक्षिक्षण देऊन स्वतःच स्वतःच रक्षण कसे करता येईन तसेच जर कोणी महिलांसोबत असभ्य वर्तन करेल तर शिव मावळे त्याचा चौरंग करतील.असे सांगत सत्यजित पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.दिवसेंदिवस दररोज मुंबई, पुणे यासारख्या शहरातून दररोज ३ ते ४ मुली गायब होत आहेत. अनेक मुलींवर, महिलांवर अन्याय केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर लहान मुली व महिलांवर होणाऱ्या अन्यायाला, अत्याचारला विरोध करण्यासाठी मुलींना व महिलांना आत्मनिर्भर व सक्षम बनविण्याच्या दृष्टीकोणातून मुलींसाठी व महिलांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कळंबुसरे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी गजानन गायकवाड यांची बिनविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

दि. १६ डिसेंबर, २०२५ रोजी उरण तालुक्यातील कळंबूसरे ग्रामपंचायतीची उपसरपंच पदाची निवडणूक पार पडली. या निवडणुकीमध्ये शिक्षण खात्यात मोलाचे योगदान दिलेले माजी मुख्याध्यापक, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे व महाविकास आघाडी कळंबुसरे ग्रामपंचायत सदस्य, गेली १५ वर्षे संत रविदास मंडळाचे उरण तालुका अध्यक्ष, अलिबाग-विरार कॉरिडोर संघटना सदस्य, टाकवडखाड शेतकरी सामाजिक संस्थेचे सचिव, सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे सचिव व रायगड जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघाचे उपाध्यक्ष अशा विविध पदांवर कार्यरत असणारे गजानन रामदास गायकवाड गुरुजी यांची कळंबुसरे ग्रामपंचायत उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाली



आहे.त्यांच्या झालेल्या या निवडीबद्दल उरण विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मनोहर शेठ भोईर, उरण तालुका प्रमुख संतोषजी ठाकूर, विभाग प्रमुख अनंता पाटील, उपविभाग प्रमुख प्रकाश हिरामण पाटील, शाखाप्रमुख रमेश बारकू पाटील, उपशाखाप्रमुख पद्माकर नारायण पाटील, उरण तालुका युवासेना चिटणीस जितेंद्र पाटील, कळंबूसरे ग्रामपंचायत विद्यमान सरपंच उर्मिला निनाद नाईक, सदस्य प्रशांत पाटील, समीर म्हात्रे, रेश्मा पाटील, सारिक पाटील, सविता नाईक, स्वप्नाली पाटील तसेच माजी सरपंच बेबीताई पाटील, माजी सरपंच अनिता पाटील, हिराचंद्र पाटील, कैलास नाईक, अनंत म्हात्रे तसेच उपस्थित सर्व शिवसैनिक तसेच महाविकास आघाडीचे, कळंबुसरे काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष माजी सरपंच रामदास मायाजी जाधव, काँग्रेसचे युवा सामाजिक कार्यकर्ते विक्रांत भालचंद्र पाटील तसेच आघाडीतील सर्व कार्यकर्ते व उपस्थित कळंबूसरे ग्रामस्थ यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.योग्य व अनुभवी व्यक्तीची उपसरपंच पदी निवड झाल्याने गजानन गायकवाड यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मराठा पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

# मराठा पतसंस्था समाजात एक आदर्श निर्माण करीत आहे-प्रा खासेराव शितोळे

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

यंदा स्वतःचे रोप्य महोत्सव वर्ष साजरे करणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या २५ व्या वर्षातील आकर्षक दिनदर्शिकेचे प्रकाशन मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक मराठा भूषण पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त प्राचार्य खासेराव शितोळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ मार्गदर्शक व मराठा भूषण प्रा. पोपटराव काळे हे होते.

अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या २५ व्या वर्षातील आकर्षक दिनदर्शिकेचे प्रकाशन मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक मराठा भूषण पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त प्राचार्य खासेराव शितोळे यांच्या हस्ते झाले.यावेळी प्रा. पोपटराव काळे,ज्येष्ठ संचालक किशोर मरकड ,ज्ञानेश्वर अनभुले ,सतीश इंगळे, द्वारकाधीश भोसले, अच्युत गाडे, कायदेशीर सल्लगार ॲड रविद्र



शितोळे ,शेळके ,कार्यकारी अधिकारी अशोक वारकड उपकार्यकारी अधिकारी बबनराव सुपेकर आदी उपस्थित होते

मराठा पतसंस्था दरवर्षी सभासद ठेवीदार हितचिंतक यांच्यासाठी दिनदर्शिका प्रकाशित करीत असते यामध्ये मराठा व बहुजन समाजातील महापुरुष संत युगपुरुष व आधुनिक विचारांचे विचारवंत यांचे वाढदिवस, जयंती, पुण्यतिथी याचा उल्लेख असलेले दिनदर्शिका प्रकाशित करीत असते यावर्षी नारीशक्तीला महत्त्व देऊन प्रथमदर्शनी बहुजन समाजातील ज्या ज्या महिलांनी त्या त्या काळात जे बहुमोल कार्य केले आहे त्याची आठवण व्हावी म्हणून त्यांचे छायाचित्र असलेले मुखपृष्ठ प्रसिद्ध केले आहे त्याचबरोबर पतसंस्थेची वाटचाल याची माहिती देण्यात आली आहे. सदर दिनदर्शिका आजपासून सभासद ठेवीदार हितचिंतक कर्जदार यांना देण्यात येणार आहे अशी माहिती उपाध्यक्ष बाळासाहेब काळे यांनी दिली. यावेळी बोलताना प्राचार्य खासेराव शितोळे म्हणाले की, गेली २४ वर्ष या पतसंस्थेने अलौकिक कामगिरी केली आहे. मराठा व बहुजन समाजाचा विश्वास संपादन करून ५८ कोटीच्या ठेवी तर चाळीस कोटीचे कर्ज वाटप केले आहे ज्याला पत नाही त्याला पत देण्याचे काम ही पतसंस्था करत आहे. तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवून ही संस्था समाजात एक आदर्श निर्माण करीत आहे यांच्या मागे समाजाने खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.

यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना पोपटराव काळे म्हणाले की, या पतसंस्थेचे अनेक तालुक्यात शाखा आहेत मुख्य शाखेसह त्याही शाखा उत्तम प्रकारे चालले आहेत याचा मला विशेष अभिमान आहे. यावेळी बोलताना ज्येष्ठ संचालक ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की या पतसंस्थेचा मी संचालक आहे याचा मला अभिमान आहे आम्ही कर्ज प्रकरणे मंजूर करताना अतिशय गांभीर्याने लक्ष देऊन मंजूर करतो त्यामुळे कर्ज वसुलीस आम्हाला त्रास होत नाही.

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक ज्येष्ठ संचालक किशोर मरकड यांनी केले तर आभार संचालक ज्ञानेश्वर अनभुले यांनी मानले. यावेळी शाखाधिकारी पुष्पा इंगळे ,कविता ढोणे ,प्रशांत बोरुडे ,मनीष रोकले ,सार्थक पाणे पवन आदि उपस्थित होते.

# सामूहिक श्रमदानातून जलसंवर्धनाची यशस्वी क्रांती

## शिवनी–सायाळ शिवारात मातीच्या बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांना पाणीसमृद्धीचा दिलासा

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील– शिवनी (जा)–सायाळ शिवारात शेतकऱ्यांच्या एकत्रित श्रमदानातून उभारण्यात आलेल्या भक्कम व मोठ्या क्षमतेच्या मातीच्या बंधाऱ्यामुळे जलसंवर्धनाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकण्यात आले आहे. अन्नदाता सुखी भव शेतकरी गट (सायाळ–शिवनी), कृषी क्रांती शेतकरी गट (जामगा–शिवनी) आणि श्री जिरगा मारुती शेतकरी गट (शिवनी) या तीनही शेतकरी गटांनी कृषी प्रधान ऑर्गानिक कंपनीचे अध्यक्ष रत्नाकर पाटील ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली एकत्र येत हा उपक्रम यशस्वीपणे साकार केला आहे.या मातीच्या बंधाऱ्यामुळे सुमारे ४०० मीटरपर्यंत मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून त्या पाण्याचे जमिनीत प्रभावीपणे मुरण झाले आहे. परिणामी, परिसरातील विहिरी व बोअरवेल्सच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली असून, पाण्याच्या टंचाईने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.सध्या या बंधाऱ्यावरून १० मोटारींच्या सहाय्याने सुमारे ५० एकर क्षेत्रावरील ज्वारी पिकाला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे येत्या हंगामात चांगल्या व भरघोस उत्पादनाची शेतकऱ्यांना आशा निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, जमिनीत मोठ्या प्रमाणात पाणी साठल्यामुळे पुढील किमान सहा महिन्यांपर्यंत विहिरी व बोअरवेल्सची पाणीपातळी स्थिर व समाधानकारक राहणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.या बंधाऱ्याचा फायदा केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता, परिसरातील जनावरे, पशुपक्षी तसेच रानटी प्राणी यांनाही पिण्याच्या पाण्यासाठी होत असून, हा उपक्रम पर्यावरणदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.विशेष बाब म्हणजे, या संपूर्ण उपक्रमासाठी शेतकऱ्यांनी कोणतीही शासकीय किंवा बाह्य मदत न घेता केवळ सामूहिक श्रमदानातून बंधारा उभारून आदर्श निर्माण केला आहे. अन्नदाता सुखी भव



शेतकरी गटातून रत्नाकर ढगे, सुदाम पाटील, संभाजी पाटील, माधव पाटील, स्वप्नील, केशव, त्र्यंबक, हरिचंद्र, निवृत्ती, मनोज, रामकृष्ण, अच्युत, उत्तम;कृषी क्रांती शेतकरी गटातून गणपत जामगे, शुभम जामगे, पंढरीनाथ जामगे, बाळू जामगे;तर श्री जिरगा मारुती शेतकरी गट (शिवनी) मधून चांदोजी जामगे, शिवार जामगे, नाना जामगे, पांडुरंग जामगे, विठ्ठल जामगे, सोपान जामगे, हनुमंत जामगे, फुलाजी जामगेया सर्व शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन या कार्यात मोलाचे योगदान दिले.यावेळी बोलताना रत्नाकर ढगे म्हणाले की, जर प्रत्येक गावातील शेतकरी गटांनी एकत्र येऊन अशा प्रकारचे मातीचे बंधारे उभारले, तर निश्चितच जमिनीत पाणी मुरेल, भूजल पातळी वाढेल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक व नैसर्गिक संकट दूर होईल. जिल्ह्यात सर्वत्र असे उपक्रम राबवले गेले, तर खरी अर्थाने जलक्रांती घडून येईल.शिवनी–सायाळ शिवारातील हा उपक्रम केवळ एक बंधारा नसून, तो सामूहिक प्रयत्न, श्रमदान, जलसंवर्धन आणि शाश्वत शेतीचा प्रेरणादायी आदर्श ठरत आहे. अशाच प्रकारचे उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबवले गेले, तर दुष्काळमुक्त व पाणीसमृद्ध ग्रामीण भाग निर्माण होणे निश्चितच शक्य आहे.

# तळोदा तालुकास्तरीय दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनाचे दिमाखात उद्घाटन; ५७ प्रकल्पांचे सादरीकरण

## सर्व बाल वैज्ञानिक इतिहास घडवतील–उपशिक्षणाधिकारी सोनवणे

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

विज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता प्रयोगातून शिकावे. आपले विचार आणि सिद्धांत आत्मविश्वासाने मांडले तर भविष्यात येथूनच जिल्हा, राज्य आणि देश पातळीवर जाणारे वैज्ञानिक घडतील. क्रमांक कोणाचाही येवो, आपली जिज्ञासू वृत्ती शाबूत ठेवणारा प्रत्येक बाल वैज्ञानिक इतिहास घडवेल, असे प्रतिपादन उपशिक्षणाधिकारी भावेश सोनवणे यांनी केले.



तळोदा तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, देवमोगरा विद्याप्रसारक मंडळ संचलित गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालय आणि शिक्षण विभाग पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५–२६' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. नंदुरबार जिल्ह्यातील या पहिल्या तालुकास्तरीय प्रदर्शनाचे उद्घाटन देवमोगरा विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष चेतन पवार यांच्या हस्ते पार पडले. यावेळी व्यासपीठावर पोलीस निरीक्षक राजन मोरे, गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर, रोहित माळी, वसंत जाधव, आरती शिंपी, प्रतिभा मगरे, मेघा पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या दोन दिवसीय प्रदर्शनासाठी तळोदा शहरातील कन्या विद्यालयाचे रूपांतर 'पितृछाया विज्ञान नगरी'त करण्यात आले आहे. प्रदर्शनात एकूण ५७ प्रकल्प सादर करण्यात आले आहेत: प्राथमिक गट (इ. ६ वी ते ८ वी): ३३ नाविन्यपूर्ण प्रकल्प. माध्यमिक व उच्च माध्यमिक गट (इ. ९ वी ते १२ वी): २४ प्रकल्प. यावर्षी प्रदर्शनाचा मुख्य विषय 'समाजासाठी विज्ञान व तंत्रज्ञान' हा आहे. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील समस्यांवर आधारित विविध उपविषयांवर आपले मॉडेल सादर केले आहेत, ज्यात प्रामुख्याने: नैसर्गिक शेती आणि कृषी तंत्रज्ञान. अन्न, आरोग्य आणि स्वच्छता. आपत्ती व्यवस्थापन आणि संसाधन व्यवस्थापन. कचरा व्यवस्थापन आणि दळणवळण. गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार. शालेय जीवनात विज्ञानाची गोडी लागावी, मुलांची निरीक्षण क्षमता आणि तांत्रिक कौशल्य वाढावे, या उद्देशाने हे प्रदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे.आयोजक समितीने सांगितले आहे उद्या पारितोषिक वितरण व समरोप:– दिनांक १८ रोजी पहिल्या दिवशी तालुक्यातील शेकडो विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी प्रदर्शनाला भेट दिली. उद्या, दुसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक १९ रोजी दुपारी प्रदर्शनाचा समारोप होईल. या समारंभासाठी उद्घाटक म्हणून शिक्षणाधिकारी प्रविण अहिरे तर अध्यक्ष म्हणून तहसीलदार दीपक धिवरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी उत्कृष्ट प्रकल्पांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात येईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता साळवे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक मिलिंद ढोडरे यांनी मानले. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी कन्या विद्यालयाच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) यांचे शासकीय आय.टी.आय कॉलेज बार्शी लिमिटेड मार्फत एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**बार्शी | प्रतिनिधी**

दि.१८ डिसेंबर २०२५ रोजी भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत शासकीय आय.टी.आय कॉलेज बार्शी येथे एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य श्री.प्रदीप हरिदास सर यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून (सेबी) तसेच सी.डी.एस.एल.चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सरयांनी उपस्थित विद्यार्थिनींना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थांना सेबी तसेच सी.डी.एस.एल ची कार्य प्रणाली विशद केली. तसेच बचत व बचतीचे महत्त्व समजावून सांगितले.राष्ट्रीयकृतबँकेत असलेल्या विविधयोजना, डिमॅट अकाउंट,शेअर मार्केट,म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी कॉलेजचे उपप्राचार्य श्री.युवराज मढेकर सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन व सूत्र संचालन केले.या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिस्तुलने गोळ्या झाडून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपातुन आरोपीची निर्दोष मुक्तता

## अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

पिस्तूलने गोळ्या झाडून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या गंभीर आरोपा तून आरोपीची अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली.अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयातील ड.उ.छे.२९ /२०२५ या प्रकरणात आरोपीविरुद्ध कलम१०९, ११५, ३५२, ३५१ भा.न्या.सं.तसेच कलम ३ व २५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ.रचना आर.तेहरा यांनी केली.सरकार पक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा,तसेच आरोपीच्या विधिज्ञांनी घेतलेला उलट तपास व सादर केलेले युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरले.सरकार पक्ष आरोपीविरुद्ध आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याने न्यायालयाने आरोपी प्रकाश मुंडे यांची निर्दोष मुक्तता केली.आरोपीच्या वतीने विधिज्ञ




डी.एम.काजगुंडे यांनी प्रभावीपणे काम पाहिले. त्यांना विधिज्ञ ए.डी. शेरेकर,बी.आय.चौधरी, अक्षय इंगळे व अनिल राठोड यांनी सहकार्य केले.अत्यंत गंभीर स्वरूपाचे व बहुचर्चित असलेले हे प्रकरण असल्याने निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. न्यायालयाच्या या निर्णया मुळे कायदेशीर वर्तुळात तसेच परिसरात विधीज्ञ डी.एम.काजगुंडे यांनी आरोपी प्रकाश मुंडे यांची बाजू योग्य रीतीने मांडली याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# तोरणमाळच्या पर्यटन विकासाला मिळणार गती; जिल्हाधिकाऱ्यांकडून विकासकामांची पाहणी व आढावा

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेल्या तोरणमाळच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांनी नुकतीच तोरणमाळला भेट देऊन पर्यटन विकासाशी संबंधित विविध प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.



> पर्यटन, पायाभूत सुविधा आणि स्थानिक लोकांचा सहभाग यांचा योग्य समन्वय साधून तोरणमाळचा विकास केला जाईल. यामुळे पर्यटनाच्या नकाशावर तोरणमाळचे नाव अधिक ठळक होईल. – डॉ. मित्ताली सेठी, जिल्हाधिकारी, नंदुरबार.

या भेटीदरम्यान 'इंडियन ग्रामीण सर्व्हिसेस' व 'एकिबेकी' संस्थेच्या प्रतिनिधींसह विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

या दौऱ्यात जिल्हाधिकाऱ्यांनी तोरणमाळ येथील 'ग्रामीण मार्ट' साठी प्रस्तावित असलेल्या जागेची पाहणी केली. स्थानिक उत्पादकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे, ग्रामीण उत्पादनांचे मूल्यवर्धन करणे आणि त्याद्वारे स्थानिक आदिवासी युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

तोरणमाळला पर्यटकांच्या पसंतीचे केंद्र बनवण्यासाठी दरवर्षी ४ दिवसीय वार्षिक मेळा आयोजित करण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. या मेळ्यामुळे तोरणमाळच्या संस्कृतीची ओळख पर्यटकांना होईल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पर्यटकांच्या सुविधेसाठी तोरणमाळमध्ये दर्जेदार निवास व्यवस्था असणे आवश्यक आहे. ही गरज ओळखून जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी येथे सुसज्ज रिसॉर्ट उभारणीसाठी तातडीने आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच, सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांची गुणवत्ता तपासून ती कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. प्रशासनाच्या या सक्रियतेमुळे तोरणमाळमध्ये केवळ पर्यटनच वाढणार नाही, तर दुर्गम भागातील नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा मार्गही मोकळा होणार आहे.

## नंदुरबारमध्ये 'अल्पसंख्यांक हक्क दिन'उत्साहात; गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शकांचा गौरव

# प्रशासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवणे ही आमची जबाबदारी–अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

अल्पसंख्यांक समाजाच्या हक्कांची जाणीव आणि सर्वांगीण विकासाचा संदेश देण्यासाठी नंदुरबार येथे 'आंतरराष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित या कार्यक्रमात विविध स्पर्धा, मार्गदर्शन परिसंवाद आणि योजनांच्या माहिती फलकांचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे होते. अल्पसंख्यांक विकास विभाग व जिल्हा नियोजन विभागाच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व, भित्तीपत्र आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये काजी निदा फातेमा, लायबा सैय्यद, फहमिना शाह यांसह अनेक विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला तो म्हणजे 'रहेबर शाळे'चा विद्यार्थी मोहम्मद दानिश कुरैशी. दोन्ही डोळ्यांनी दिव्यांग असूनही त्याने वक्तृत्व स्पर्धेत घेतलेला सहभाग सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. या जिद्दीबद्दल अल्पसंख्यांक अधिकारी व कर्मचारी संघटनेतर्फे त्याला १,१०० रुपयांचा विशेष रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे विजय सैंदाणे व जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे यांनी समाजासाठी असलेल्या शैक्षणिक, आर्थिक व पायाभूत विकासाच्या योजनांची माहिती दिली. अप्पर जिल्हाधिकारी गोगटे यांनी आपल्या भाषणात, शासनाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन केले.प्राचार्य फैय्याज पठाण, हरीष बोरसे, रफिकजहांगीरदार, जव्वाद सैय्यद व सहकारी.पोलीस भरती प्रशिक्षणासाठी अशफाक इनामदार व जव्वाद कुरैशी. या प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी आशा सांघवी, प्राथमिक शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे व सामाजिक कार्यकर्ते एजाज बागवान, मौलाना जकेरीया, अमिन कुरैशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. युनूस पठाण यांनी केले, तर आभार शशांक काळे यांनी मानले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077